**सं.फौ.ख.क्र.४३७/२०२२**
सरकार — वि.- बळीराम खोडके
निशाणी - १४

**सरकारतर्फे साक्षदार क्रं.- १**

मी शपथपुर्वक खरे सांगतो की,

नाव - प्रल्हाद रामभाऊ वानखेडे
वय - ६१ वर्ष, व्यवसाय - सेवानिवृत्त
राह.- वाघुळ, ता.मलकापुर, जि. बुलढाणा.

**सरतपासणी सरकारतर्फे विदवान सहाय्यक सरकारी अभियोक्ता - श्री.के.व्ही.गारमोडे यांचे मार्फत सुरु -**

दि.१०.०१.२०२२ रोजी मी पोलिस स्टेशन बोराखेडी येथे कार्यरत होतो. दि.०७.०६.२०२१ रोजी मी पोलिस स्टेशन बोराखेडी येथे सहायक पोलिस उपनिरीक्षक या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मृतक प्रविण रमेश वैतकार, रा. भाडगणी याचे मृत्यु बाबतचे कागदपत्र पोलिस स्टेशन, मलकापुर येथुन प्राप्त झाले. त्याचा मर्ग क्रमांक २०/२०२१ कलम १७४ प्रमाणे होता. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे सदर तपास माझेकडे देण्यात आला.त्यानंतर दि.१०.०६.२०२१ रोजी मी ग्राम भाडगणी येथील घटनास्थळी गेलो. त्याठिकाणी मी दोन पंचासमक्ष दिसत्या परिस्थितीचा पंचनामा तयार केला. घटनास्थळ बळीराम शिवराम खोडके यांनी दाखविले होते. त्याठिकाणी इलेक्ट्रीक लोखंडी पोलवरून उत्तर-दक्षिण विदयुत वाहिनी गेली होती. सदर लोखंडी इलेक्ट्रीक पोलच्या बाजुला दोन चपला पडलेल्या होत्या. त्या ठिकाणाहुन मृतकाला इलेक्ट्रीक करंट लागल्यामुळे उपचाराकामी नेले होते असे घटनास्थळ दाखविणारे व तेथील लोकांनी सांगितले होते. त्यानंतर मी घटनास्थळावरून चप्पल जप्त केली. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी व पंचाची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१५** देण्यात येते. त्यानंतर विदयुत निरीक्षक, खामगाव यांना घटनास्थळ अहवाल मिळणेबाबत मी पत्र दिले होते.आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१६** देण्यात येते. त्यानंतर मी मृतकाला दवाखान्यात नेणा-या लोकांचे तसेच मृतकाच्या

नातेवाईकांचे जबाब नोंदविले. तपासादरम्यान मी मृतकाचा शवविच्छेदन अहवाल प्राप्त करून घेतला. तो मी दोषारोपपत्रासोबत जोडला आहे. मी घटनास्थळाचे व डी.पी.चे छायाचित्र काढले होते. त्यावर पोलिस निरीक्षक, बोराखेडी यांची सही आहे. त्यास आर्टीकल अ देण्यात येते. तपासादरम्यान मी विदयुत निरीक्षक यांचा अहवाल प्राप्त करून घेतला होता. तो अहवाल मी दोषारोप पत्रासोबत दाखल केला आहे. आता मला सदरचा अहवाल दाखविण्यात आला. हा तोच अहवाल आहे. त्यास **नि.क्र.१७** देण्यात येते. तपासादरम्यान आरोपीने निष्काळजीपणे विदयुत केंन्दीय प्राधीकरण नियमाचे उल्लंघन केल्याचे निष्पन्न झाल्याने मी त्यांचेविरूध्द फिर्याद दिली. आता मला तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१८** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येते. तपासादरम्यान मला मर्ग खबरी, इन्क्वेस्ट पंचनामा, मर्ग बोराखेडी येथे वर्ग करण्याबाबतचे पत्र तसेच पंचाचे सुचनापत्र, नातेवाईकांना दिलेले समन्स इ. कागदपत्रे प्राप्त झाले होते. मी मृतकाचा शवविच्छेदन अहवाल मिळणेबाबत वैदयकीय अधिकारी यांना पत्र दिले होते. आता मला सदरचे पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विदवान अधिवक्ता श्री.एस.एस.मोरे यांच्या मार्फत सुरु.**

२. मृतक हा दि.०६.०७.२०२१ रोजी मरण पावला. मृतक हा घटनास्थळावर मरण पावला अथवा उपचाराकरिता नेतांना किंवा दवाखान्यात मरण पावला हे मी सांगु शकत नाही. हे म्हणने खरे नाही की, मी तक्रार दाखल करेपर्यत त्याची चौकशी केली नव्हती. हे म्हणने खरे आहे की, मला रिपोर्ट देण्यापूर्वी मृतक आरोपी क्र.२ प्रविण रमेश वैतकर हा मयत झाल्याचे माहिती होते. मयत झालेल्या व्यक्तीविरूध्द तक्रार देता येते. मयत व्यक्तीला अटक करता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, मृतक व्यक्तीविरूध्द अहवाल नि.क्र.१७ आल्यामुळे मी त्याचेविरूध्द तक्रार दिली होती. सदरचा अहवाल नि.क्र.१७ हा मी तक्रार

दाखल करण्यापूर्वी मला प्राप्त झाला होता. सदरचा अहवाल नि.क्र.१७ हा दि.२६.०७.२०२१ रोजीचा आहे. नि.क्र.१७ हा अहवाल पोलिस स्टेशनला देण्यापूर्वी विदयुत निरीक्षक यांनी किंवा संबंधित अधिका-यांनी घटनास्थळावर जावून चौकशी केली होती किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणने खरे आहे की माझे विदयुत संदर्भात प्रशिक्षण झाले नाही अथवा मला त्याबाबत माहिती नाही. हे म्हणने खरे आहे की, नि.क्र.१७ या अहवालानुसार मी आरोपीविरूध्द तक्रार देण्याची कारवाई केली होती. हे म्हणने खरे आहे की नि.क्र.१७ हा दि.१६.०९.२०२१ रोजी पोलिस स्टेशनला प्राप्त झाला होता. हे म्हणने खरे नाही की, मी आरोपी क्र.१ ला कोणतेही कारण नसतांना त्याचे विरूध्द खोटा रिपोर्ट दिला व त्यास खोटया केस मध्ये गोवले आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपीने माझे विरूध्द माझे वरिष्ठांकडे त्याला खोटया केसमध्ये गोवल्याबाबत माझी तक्रार केली होती. हे म्हणने खरे नाही की, माझेवर कारवाई होवू नये म्हणून मी संगणमत करून नि.क्र.१७ तयार करून या प्रकरणात दाखल केला. हे म्हणने खरे नाही की मी खोटी कारवाई करून खोटी तक्रार केली. हे म्हणने खरे आहे की, ज्या डी.पी.वर आरोपी क्र.१ हा होता त्या डी.पी.बाबत मी पंचनामा तयार केला नाही व चौकशी सुध्दा केली नाही.

**उलटतपास संपला.**

**फेर तपास काही नाही**.

समक्ष

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/-
**(अतुल उ.मोटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र-२), मलकापूर
**दि.१७/०७/२०२५**

स्वा/-
**(अतुल उ.मोटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र-२), मलकापूर